VOGL/Sec./SE/2026-27/22 **July 30, 2026**

To
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street, Fort
Mumbai - 400 001

**BSE Scrip Code: 544782**

To
National Stock Exchange of India Limited
"Exchange Plaza" Plot No C/1, G Block
Bandra Kurla Complex, Bandra (East)
Mumbai- 400051

**NSE Scrip Code: VOGL**

**Sub: Newspaper Advertisements – Unaudited Financial Results for the First Quarter ended June 30, 2026**

Dear Sir/Ma'am,

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended from time to time, read with relevant circulars issued in this regard, please find enclosed the copies of the newspaper advertisements for Unaudited Financial Results of the Company for the first quarter ended June 30, 2026, published today i.e. July 30, 2026, in the following newspapers:

- Financial Express (English)
- Navshakti Marathi (Marathi).

The aforesaid copies have also been made available on the website of the Company at www.vedantaoilandgas.com

We request you to please take the above on record.

Thanking you.
Yours sincerely,
For **Vedanta Oil and Gas Limited**
***(Formerly known as Malco Energy Limited)***

SHIVANGI DHANUKA
Digitally signed by SHIVANGI DHANUKA
Date: 2026.07.30 11:50:10 +05'30'

**Shivangi Dhanuka**
**Company Secretary and Compliance Officer**
**Membership No.: A 70586**

Enclosed: As above.

## शाडूची माती की पीओपी, प्रदूषण कशाने?

# सरकारची शुक्रवारी बैठक

**उर्वी महाजनी/मुंबई**

पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बसवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावर विचार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ३१ जुलै रोजी सर्व संबंधितांची बैठक घेणार आहेत, अशी माहिती राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाला बुधवारी दिली.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर ॲडव्होकेट जनरल मिलिंद साठे यांनी ही माहिती सादर केली. 'मन की बात' कार्यक्रमात पंतप्रधानांनी केलेल्या सूचनेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक बोलावण्यात आल्याचे साठे यांनी न्यायालयात सांगितले.

या प्रकरणी कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्व मुद्द्यांचे सर्वसमावेशक संकलन न्यायालयात सादर करावे, असे निर्देश खंडपीठाने दिले. तसेच मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत होणारा निर्णय या प्रकरणात अत्यंत महत्त्वाचा ठरेल, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

सुनावणीदरम्यान 'पीओपी' मूर्ती उत्पादकांची बाजू मांडताना वकील उदय वारुंजीकर यांनी दावा केला की, "केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२० च्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर आधार नाही. त्यामुळे त्यांची सक्तीने अंमलबजावणी करता येणार नाही. प्रदूषणाचे मूळ कारण शोधणे ही मुख्य समस्या असल्याचे सांगत शाडूची माती आणि पीओपी या दोन्ही प्रकारच्या मूर्तींचा पर्यावरणावर परिणाम होतो."

शाडूची माती जलाशयांच्या तळाशी साचते, तर मूर्तींसाठी वापरले जाणारे कृत्रिम रंग हे 'पीओपी'पेक्षा अधिक हानिकारक असतात, असा दावाही त्यांनी केला. मात्र, हे प्रकरण केवळ पीओपी मूर्तींमुळे होणाऱ्या प्रदूषणापुरते मर्यादित आहे, गणेशोत्सव साजरा करण्यावर किंवा मिरवणुकांवर आमचा आक्षेप नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

शाडूच्या मातीनेही प्रदूषण होते असा युक्तिवाद झाला असता, पीओपीमुळे कमी प्रदूषण होते असे कोणता तज्ज्ञ सांगतो, असा सवाल न्यायमूर्ती गडकरी यांनी केला. 'पीओपी'मुळे कमी प्रदूषण होते, असा तज्ज्ञांचा अहवाल सादर करा, असे निर्देशही न्यायालयाने दिले.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पावले उचलणार

### नैसर्गिक रंगाचा वापर करण्यासाठी उपाय सुचवण्याचे निर्देश

न्यायमूर्ती खाता यांनी सुचवले की, मोठ्या सजावटीच्या मूर्तींचे पुनर्चक्रण केले जाऊ शकते आणि छोट्या शाडूच्या मूर्तींचे विसर्जन करता येऊ शकते. आम्ही कोणाच्याही धार्मिक भावना दुखावत नसून केवळ नैसर्गिक जलस्रोत आणि भावी पिढ्यांच्या सुरक्षेचा विचार करत आहोत, असे त्यांनी नमूद केले. मूर्तीकारांनी कृत्रिम रंगांऐवजी नैसर्गिक रंगांचा वापर करण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर, प्रत्येक सूचनेला विरोध न करता ठोस उपाय सुचवा, असे खडे बोल न्यायालयाने सुनावले. या प्रकरणाची सुनावणी गुरुवारीही सुरू राहणार आहे.

# फोर्टमधील 'पूर्णिमा' हॉटेलची हायकोर्टात याचिका

**मुंबई** : फोर्ट परिसरातील वकील आणि नोकरदारांचे आवडते दाक्षिणात्य उपाहारगृह 'पूर्णिमा'च्या मालकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गेल्या शुक्रवारी अचानक तपासणी करून या हॉटेलला ठोकलेले टाळे आणि निलंबित केलेला परवाना याविरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. एफडीएचे निष्कर्ष चुकीचे आणि खोटे असल्याचा दावा मालकांनी केला आहे.

### एफडीएच्या कारवाईला आव्हान

अन्न आणि औषध नियंत्रण कायद्यांतर्गत त्रुटी सुधारण्यासाठी १४ दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे. असे असताना एफडीएने थेट 'एफएसएसएआय' परवाना निलंबित केला, असा दावा पूर्णिमा उपहारगृहाच्या मालकांनी याचिकेत केला आहे.

एफडीएने शेवग्याच्या शेंगा आणि केळ्यांवर बुरशी असल्याचा आरोप केला आणि कारवाई केली. मात्र, केवळ लॅब टेस्टद्वारेच बुरशी सिद्ध होऊ शकते. हॉटेलने अन्नपदार्थांचे नमुने घेण्याची विनंती केली असता, अधिकाऱ्यांनी नकार दिला. केळीचे साल नैसर्गिकरित्या काळे पडते, ती बुरशी नाही, असा युक्तिवाद हॉटेलने केला आहे.

दुपारच्या गर्दीनंतर हॉटेलमध्ये साफसफाई आणि लादी पुसण्याचे काम सुरू होते. फरशी ओली असणे आणि उपकरणांवर अन्नकण दिसणे स्वाभाविक होते, जे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे. तसेच हॉटेलच्या भिंतींवर पूर्ण टाईल्स आणि छतावर ॲल्युमिनियमचे क्लॅडिंग असताना एफडीएच्या नोटीसमध्ये भिंतींचे प्लास्टर आणि रंग निघत असल्याचा खोटा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच हॉटेलमध्ये कोणतीही झुरळे किंवा उंदीर आढळलेले नाहीत, असेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी शुक्रवारी सुनावणी होण्याची शक्यता आहे.



# देशात युवाशक्तीपेक्षा बुवाशक्ती जास्त माजली आहे

### शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची टीका

**मुंबई** : आज देशात युवा शक्तीपेक्षा बुवाशक्ती जास्त माजली आहे. देशाचे भविष्य युवक आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून देश पुढे जाऊ शकत नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी येथे केली.

छत्रपती शिवाजी महाराजांना अफझलखानाने 'पहाडी चुहा' म्हटले होते. त्यामुळे आज युवकांना झुरळ म्हणणाऱ्यांमध्ये काय फरक आहे? असा सवालही त्यांनी केला. सर्वात श्रेष्ठ धर्म माणुसकी आहे, असेही ते म्हणाले.

शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रवक्ते आणि जनसंपर्क प्रमुख हर्षल प्रधान यांच्या 'मार्मिक प्रकाशनाचे शतक' आणि 'मर्मभेद' या दोन पुस्तकांचे तसेच व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर यांनी संपादन केलेल्या 'ज्वलंत रेषा बाळ केशव ठाकरे' या पुस्तकाचे प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते बुधवारी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पार पडले. यावेळी ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव, नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत, मार्मिकचे कार्यकारी संपादक मुकेश माचकर आदी मान्यवर उपस्थित होते. "माणसाने धर्माला जन्म दिला आहे, धर्माने माणसाला नाही," असेही ते म्हणाले.

### बाळासाहेबांची भाषा ही 'त्या' काळाची गरज

राजकारणात आल्यानंतर बाळासाहेबांसारखी भाषा का वापरत नाही, असा प्रश्न वारंवार विचारला जात असल्याचे सांगत उद्धव ठाकरे यांनी शिल्पकाराचे उदाहरण दिले. "माझ्या आजोबांनी आणि वडिलांनी समाजरूपी मूर्ती घडवण्यासाठी हातोडा आणि छिन्नी वापरली. आज ती मूर्ती घडली आहे. आता तिची पूजा करण्याची वेळ आहे," असे ते म्हणाले.

# आर्थिक श्वेतपत्रिकेनंतरच पालिकेने रोखे जारी करावे

### समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांची मागणी

**मुंबई** : आशियातील श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महापालिकेने 'पालिका रोखे'च्या (म्युनिसिपल बॉण्ड्स) माध्यमातून ९,५०० कोटी रुपये उभारण्याची योजना आखली आहे. डिसेंबरपर्यंत हे रोखे जारी होणार आहेत. मात्र पालिकेच्या गुंतवणीकीबाबतची आर्थिक श्वेतपत्रिका पालिका प्रशासनाने प्रथम काढावी आणि त्यानंतर हे रोखे जारी करावेत, अशी मागणी समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी केली.

प्रस्तावित रोख्यांच्या व्यवस्थापनासाठी पालिकेने ए.के. कॅपिटल सर्व्हिसेस, टिप्सन्स कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि ट्रस्ट इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्स या तीन कंपन्यांची निवड केली आहे.

रोखे जारी करण्याच्या प्रक्रियेत मर्चंट बँकर म्हणून या कंपन्या काम पाहणार आहेत. घाईघाईत रोखे जारी करण्यास पालिकेतील नगरसेवकांचा प्रथमपासून विरोध असून आजही कायम आहे.

रोखे एक प्रकारे कर्ज आहे. याचे व्याज पालिकेला द्यायचे आहे. या सगळ्यांचा अप्रत्यक्ष बोजा मुंबईकरावर पडणार आहे, असेही ते म्हणाले.

# २९ ऑगस्टपासून निर्णायक आंदोलनाचा जरांगेंचा इशारा

**मुंबई** : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी राज्य सरकारला इशारा देत येत्या २९ ऑगस्टपासून 'शेवटचे आणि निर्णायक' आंदोलन पुकारण्याची घोषणा केली आहे.

५८ लाख कुणबी नोंदी सापडूनही हैदराबाद गॅझेटियरनुसार प्रमाणपत्रे देण्यास सरकार अपयशी ठरल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे. आता एकतर मी राहीन किंवा सरकार राहील, असा इशारा जरांगे यांनी दिला.

दरम्यान, प्रलंबित प्रकरणांची संख्या अत्यंत कमी असून काही रास्त मागण्या किंवा तक्रारी असल्यास सरकार चर्चेसाठी पूर्णपणे तयार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

समर्थकांना संबोधित करताना जरांगे म्हणाले की, "२९ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षण आंदोलनाला तीन वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे या दिवशी आंदोलनाचा अंतिम टप्पा सुरू केला जाईल. राज्यात तब्बल ५८ लाख कुणबी नोंदी आढळल्या आहेत. या नोंदींच्या आधारे पात्र बांधवांना जात प्रमाणपत्रे द्यावीत, अशी मागणी आम्ही सातत्याने सरकारकडे करत आहोत."

### मराठी तरुण टार्गेट

गेल्या तीन-चार महिन्यांपासून प्रमाणपत्रे वाटप थांबले असून मराठा तरुणांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जात असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, मराठा समाजासाठीच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, सारथीच्या योजना पूर्ववत सुरू करणे, मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणे आणि एसईबीसी प्रवर्गांतर्गत जाहीर केलेल्या सवलतींचा लाभ मिळवून देणे या प्रमुख मागण्या त्यांनी लावून धरल्या.

### सरकार चर्चेसाठी सकारात्मक -मुख्यमंत्री

मनोज जरांगे यांच्या घोषणेनंतर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, महायुती सरकारने मराठा समाजाच्या कल्याणासाठी पूर्वीच्या कोणत्याही सरकारपेक्षा जास्त आणि ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. ज्यांनी अर्ज केले आहेत, त्यांना कुणबी जात प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. सध्या प्रलंबित अर्जांची संख्या फारच कमी आहे. तरीही आम्ही त्यांच्याशी चर्चा करण्यास पूर्णपणे तयार आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.